# प्रश्नमंजूषा स्पर्धेत सेंटर पॉइंट स्कूल विजयी

**नागपूर, ता. १२ :** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसतर्फे (टीसीस) आयोजित आंतरशालेय प्रश्नमंजूषा स्पर्धेतील टीसीएस आयटीविझ फेरी वर्धमाननगरातील सेंटर पॉइंट स्कूलचा विद्यार्थी अर्चित वेणुगोपालन व संचित खेडकर यांनी स्पर्धा जिंकली. प्रादेशिक अंतिम फेरीतील विजेत्यांना हजार रुपयांची भेट वस्तू दिली. उपविजेते कृष्णा पब्लिक स्कूल, रायपूरचा गौरजा ऐरोन व यशराज मिश्राला हजार रुपयांचे गिफ्ट व्हाउचर्स तसेच स्मृतिचिन्ह व पदक देऊन गौरविले. अंतिम फेरीतील चमूंना टीसीएसतर्फे जिम बॅग, ओटीजी, पेनड्राइव्ह, इअर फोन्स, ब्लू टूथ स्पीकर्स असे आकर्षक बक्षीस दिले. राष्ट्रीय अंतिम फेरीत भाग घेण्यासाठी विजेत्या टीमला एक शिक्षक, पालकासोबत विमानाद्वारे मुंबईला नेण्यात येणार आहे. स्थानिक व्हीएनआयटीचे डायरेक्टर डॉ. नरेंद्र चौधरी आणि टीसीएस नागपूरचे सेंटर हेड अरविंद कुमार यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. संचालन गिरी 'पिकब्रेन' बालसुब्रमण्यम यांनी केले. टीसीएस आयटीविझ देशातील शहरांमध्ये विविध शहरांत घेण्यात येत आहे. यामध्ये अहमदाबाद, बेंगळुरू, चेन्नई, हैदराबाद, कोलकाता, इंदूर, नागपूर, भुवनेश्वर, कोची, दिल्ली, मुंबई आणि पुणे या शहरांचा समावेश आहे.